महावितरण

# प्रशिक्षणार्थी अभियांत्रिकी (शिकाऊ) उमेदवार भरती.

विद्युत वितरण क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या म.रा.वि.वि. कंपनी मर्यादितच्या कार्यक्षेत्रात नाशिक परिमंडळांतर्गत येणाऱ्या नाशिक व अहमदनगर जिल्हयासाठी अभियांत्रिकी प्रशिक्षणार्थी (Apprentice Engineers) **अभियांत्रिकी पदवीधारक-49, अभियांत्रिकी पदविकाधारक-13 तसेच कला व वाणिज्य पदवीधारक -16 या सवंर्गातील एकुण 70 पदे प्रशिक्षणार्थी म्हणुन वर्ष** (2026-2027) या कालावधीकरिता उमेदवारांची, त्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे **दि.05.03.2026** रोजी **(सकाळी 10.00 ते सायं. 5.30)** कागदपत्रांची पडताळणी करून निवड करण्यात येणार आहे. त्यानंतर येणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. सदर प्रशिक्षणार्थी अभियांत्रिकी (शिकाऊ) उमेदवार यांना निवड प्रक्रियेत नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील रहिवासी अधिवास असलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

**शर्ती व अटी:** 1) शिकाऊ उमेदवाराचे वय 18 वर्षे पुर्ण असणे आवश्यक आहे. 2) शैक्षणिक पात्रता मान्यता प्राप्त विद्यापिठाकडुन किंवा संसदेचे नियमाप्रमाणे अधिकृत केलेल्या संस्थेकडुन पदविधारक उमेदवार हे **अभियांत्रिकी पदवी परिक्षा बी.ई. (इलेक्ट्रीकल / इलेक्ट्रीकल अँन्ड पॉवर इंजिनिअरींग), बी.टेक (इलेक्ट्रीकल/इलेक्ट्रीकल अँन्ड पॉवर इंजिनिअरींग) तसेच पदविकाधारक उमेदवार हे विद्युत अभियांत्रीकी पदवीका (डिप्लोमा ईन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग) आणि कला व वाणिज्य शाखेतील पदवीधर** उमेदवार (मान्यता प्राप्त विद्यापीठामार्फत 10+2+3 पॅटर्न नुसार) हे **01 एप्रिल 2024** नंतर उत्तीर्ण झालेले असावेत. तसेच अंतिम वर्षाच्या परिक्षेत सरासरी किमान 60% गुण मिळवुन अंतिम परीक्षा उत्तीर्ण असणे व मागास प्रवर्गातील (अ.ज. व अ.जा. करीता) उमेदवारांकरीता अंतिम परिक्षेत किमान 55% गुण असणे आवश्यक आहे. कला व वाणिज्य शाखेतील पदवीधर उमेदवार **MS-CIT** परिक्षा उत्तीर्ण असावेत 3) ॲप्रेंटिस एक्ट नुसार आरक्षण लागु राहील. 4) प्रशिक्षण कालावधी **1 वर्षाचा** राहील. 5) प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना नियमाप्रमाणे विद्यावेतन पदवीधर उमेदवाराना **रु.9,000/-** व पदविकाधारक उमेदवारांना **रु.8,000/-** दरमहा अदा करण्यात येईल. 6) उमेदवारांनी आधारकार्ड, रहिवासी दाखला, जातवैधता प्रमाणपत्र, 10 वी 12 वी गुणपत्रक, पदवी / पदवीका परिक्षा उत्तीर्ण असल्याचे अंतिम वर्षाचे गुणपत्रक व प्रमाणपत्र आणि इतर सर्व मुळ कागदपत्रे व त्याची साक्षांकित छायांकित प्रत कागदपत्रे पडताळणीस सोबत आणणे आवश्यक आहे. 7)उमेदवाराने अर्ज करण्यापुर्वी NATS Portal **(https://nats.education.gov.in)** वर नोंदणी करून **Enrollment ID** नमुद करणे बंधनकारक आहे 8) वरील प्रमाणे दर्शविलेल्या पदांमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. मुख्य अभियंता यांना आहे. 9) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेदवाराना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक नाही याची नोंद घ्यावी. 10) निवड झालेल्या उमेदवारांची यादी नाशिक परिमंडळ कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.

**मुख्य अभियंता**
**नाशिक परिमंडळ, नाशिक**

**PRO No: 66/2026**